# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३१ वे अंक पाचवा पृष्ठे ११ मे २०२२ www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92




या अंकात

पान ०३ निराधारांचे 'आधारघर

पान ०४ पार्ल्याचा नरिमन पॉईंट: सुभाष रोड!

पान ०५ मार्जार कुळातील मोठे प्राणी (बिगकॅट्स) – बिबळ्या

पान ०६ चेंगीज खानाचा देश


पान ८

शांत समाधानी संगीतकार...

डॉ. सुनील कट्टी


# 'साठ्ये' मध्ये रंगला माध्यम महोत्सव

कोरोना काळानंतर पुन्हा एकदा नव्याने साठ्ये महाविद्यालयात माध्यम महोत्सव आयोजित करण्यात आला होता.

उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून 'शेर शिवराज' फेम अभिनेता चिन्मय मांडलेकर यांना आमंत्रित केले होते. त्यांचे ढोलताशांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. दुसऱ्या दिवशी अभिनेत्री आदिती शारंगधर, गायक मंगेश बोरगावकर, अभिनेता आशुतोष कुलकर्णी यांनी उपस्थिती नोंदवली.

दरवर्षी साठ्ये महाविद्यालयाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातर्फे विविध संकल्पनांवर आधारित माध्यम महोत्सवाचे आयोजन होत असते. 'माध्यमांची 75 वर्षे' ही यंदाच्या दोन दिवसीय माध्यम महोत्सवाची संकल्पना होती. वृत्तपत्र, टेलीव्हिजन, रेडियो, अशा विविध माध्यमांमध्ये गेल्या ७५ वर्षांत घडलेली स्थित्यंतरे टिपणारे विविध स्टॉल्स हे या माध्यम महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले.

प्रमुख अतिथी चिन्मय मांडलेकर यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना आपल्या महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला. तसेच चित्रपटातील छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारतानाचे अनुभव सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मांडलेकर म्हणाले, ''माध्यमांचा अभ्यास करणारे विद्यार्थी चांगले लेखक असतील तर त्यांना करीयरची उत्तम संधी उपलब्ध होऊ शकते"

लेखन क्षेत्राचा करियर म्हणून विचार करण्याचा सल्ला चिन्मय मांडलेकर यांनी विद्यार्थ्यांना दिला.

चार चित्रपटांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज साकारताना त्यात वैविध्य राखण्याचे आव्हान, एकीकडे 'काश्मीर फाईल्स' चित्रपटातील दहशतवादी आणि दुसरीकडे छत्रपती शिवरायांची भूमिका, अशा टोकाच्या भूमिका साकारताना घेतलेली मेहनत याविषयी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना चिन्मय यांनी मनमोकळेपणाने उत्तरं दिली.

अदिती शारंगधर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाल्या, ''सध्या समाजमाध्यमं खूप प्रभावी झाली आहेत. एक रील तुमचं आयुष्य घडवू शकतं तसंच बिघडवू शकतं. कोरोनाने आपल्या सगळ्यांनाच खूप काही शिकवलं. नवीन संधी उपलब्ध करून दिल्या. अशा महोत्सवाला भेट दिली की कॉलेजचे दिवस आठवतात आणि खूप सारी ऊर्जा मिळते."





कार्यक्रमास उपस्थित प्राचार्य माधव राजवाडे

पान २ वर


Sneh Wellness

Loving care and hygienic protection

**Product Range**

- Adult diapers, Pull up pants
- Underpads, Cotton Gloves
- Bath towels, Baby wipes
- Air bed, Backrest
- Wheelchairs, Walkers, Sticks

**Our Promise**

- Wholesale rates
- Doorstep delivery
- Wide range of brands and sizes
- Guidance for diaper selection

: 8850698373

: 9372028227





## संपादकीय

गेले काही वर्षे आंतरराष्ट्रीय राजकारणात व अर्थकारणात सुद्धा आपल्या भारताचे स्थान उंचावत आहे. भारताच्या भूमिकेला पूर्वीपेक्षा अधिक महत्व प्राप्त होऊ लागले आहे. त्याच बरोबर देशांतर्गत पायाभूत सुविधा, रस्ते, दळणवळणाची साधने, अनेक नियमांचे सुलभीकरण, अनेक क्षेत्रात संगणकाचा वापर, ह्या सर्वांमुळे आपण 'Ease Of Living' या विषयात थोडीफार प्रगती केली आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

हे जर खरे असले तर मला एका गोष्टीचे राहून राहून आश्चर्य वाटते कि अजूनही आपल्या तरुण पिढीत परदेशी जाण्याची एव्हढी क्रेझ का? एक काळ असा होता की भारतात व्यावसायिक संधी कमी होत्या, संशोधनाच्या सुविधा व वातावरण नव्हते, व त्यामुळे तरुणांना परदेशी जाण्यावाचून पर्याय नव्हता असे आपण म्हणायचो. आज भारतातील बाजारपेठ प्रचंड मोठी झाली आहे. जगभरातल्या कंपन्यांना, गुंतवणूकदारांना भारतात मोठी संधी दिसत आहे. आपला आर्थिक वाढीचा दर जगातील बहुतेक देशांपेक्षा वरचढ आहे. असे असूनही आपल्या तरुणांना देश सोडायची इतकी घाई का लागली आहे? भारतातल्या थोड्याफार संघर्षमय वातावरणाला ते घाबरतायत का? कौटुंबिक जबाबदारीपासून पळ काढतायत का? विविध बंधनांत, अंधश्रद्धेत, जातिपातीत व धार्मिक द्वेषभावनेत अडकलेल्या आपल्या समाजापासून ते सुटका करून घेत आहेत का? की परदेशातील उच्च व काहीसे मुक्त असणारे वातावरण, चंगळवाद त्यांना खुणावत आहे? अर्थात तरुणांना दोष देण्यापेक्षा त्यांना आकर्षित करण्यात आपण समाज म्हणून कोठे कमी पडतो ह्याचा विचार होणे आवश्यक आहे.

पार्ल्यापुरते बोलायचे झाल्यास, आज अनेक घरातील तरुण परदेशात आहेत किंवा जाण्याच्या तयारीत आहेत. एकटे राहणाऱ्या वृद्ध जोडप्यांची संख्या पार्ल्यात लक्षणीय आहे व दिवसेंदिवस वाढतच आहे. अश्या परिस्थितीत आईवडिलांना सांभाळणाऱ्या आजच्या पिढीला त्यांच्या वृद्धापकाळात मुलांचा आधार मिळणे कठीणच आहे. पार्ल्याची ही सर्वात मोठी समस्या बनू पहात आहे व त्याकडे आमच्या विचारवंतांनी, सामाजिक संस्थांनी, लोकप्रतिनिधींनी आत्तापासूनच लक्ष देणे आवश्यक आहे. पटतंय ना?

आम्ही पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
editorial@parlekar.com

जाहिरात व्यवस्थापन
रोहित जाधव
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

पान १ वरून

## साठ्ये’ मध्ये रंगला माध्यम महोत्सव



यांनी साठ्ये महाविद्यालयात होणा-या विविध अभ्यासक्रमांची माहिती देताना विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन दिले.

माध्यम महोत्सवाच्या दोन्ही दिवशी विद्यार्थ्यांनी वैविध्यपूर्ण कार्यक्रम सादर केले.. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव राजवाडे, उपप्राचार्य दत्तात्रय नेरकर, उपप्राचार्य प्रमोदिनी



सावंत तसंच माध्यम विभाग प्रमुख गजेंद्र देवडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

माध्यम महोत्सवाची संपूर्ण संकल्पना माहिती आणि आरेखनासह जनसंवाद विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात आणली. त्याकरता विभाग प्रमुख गजेंद्र देवडा, प्रा. रसिका सावंत, प्रा. स्मिता जैन, प्रा. सीमा केदारे, प्रा. गणेश आचवल यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. प्रसाद सावंत, संकेत सावंत, कृष्णाई सावंत, आदित्य जाधव, माधुरी सुकथनकर, दिपेश नारकर,



सिद्धी जाधव, मिताली मोरे, राजश्री दहिफळे, तन्मय सांडवे, नमिषा पराते पुष्पेश पवार या विद्यार्थ्यांनी माध्यम महोत्सवासाठी विशेष मेहनत घेतली. विद्यार्थ्यांसह रसिक प्रेक्षकांनी महोत्सवाला उत्स्फुर्तपणे प्रतिसाद दिला.






## गीतरामायणावरील कथ्थक नृत्याविष्कार



मधुराङ्ग कला संस्थेतर्फे शनिवार दिनांक १६ एप्रिल रोजी सुभाष रोड येथील रामांजनेय देवस्थानात गीत रामायणावरील कथ्थक नृत्याविष्कार सादर झाला. निमित्त होते ते हनुमान जन्मोत्सवाचे. सुधीर फडके आणि ग.दि.माडगूळकर यांची अजरामर कलाकृती ‘गीतरामायण’ यातील निवडक गाण्यांच्या आधारे प्रभू श्रीरामांचे चरित्र उलगडण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात कथ्थक नृत्यांगना व मधुराङ्ग कला संस्थेच्या संचालिका भक्ती भाटवडेकर-लळीत यांच्या राम भजनाने झाली. लता मंगेशकर यांच्या आवाजातील ‘श्री रामचंद्र कृपालु भजमन’ भजन त्यांनी सादर केले. त्यानंतर भक्ती व त्यांच्या शिष्यांनी गीतरामायणातील गीतांवर नृत्य सादर केले.

मुद्राभिनय आणि आकर्षक पदलालित्य यामुळे उपस्थित प्रेक्षक वर्ग रंगून गेला. उठावदार वेशभूषेने नृत्यास अधिकच रंगत आणली. रामजन्म, सीतास्वयंवर आणि सेतुबंधन यासारखे प्रसंग नृत्यातून दाखवण्यात आले. रावण वधाच्या प्रसंगाने नृत्याचा शेवट झाला. वानरसेनेचा उत्साह दाखवणारे ‘सेतू बांधा रे सागरी’ गीतावरील नृत्य सर्वांना खास आवडले. ‘असा हा एकच श्री हनुमान’ या गीतानंतर ‘सियावर रामचंद्र की जय’, ‘पवनसुत हनुमान की जय’ असा उत्स्फुर्त गजर भाविकांकडून करण्यात आला. लता मंगेशकर आणि पंडित भीमसेन जोशी यांच्या आवाजातील ‘राम का गुनगान करिये’ या भजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# निराधारांचे ‘आधारघर’

१९८० च्या दशकामध्ये विलेपार्ले पूर्व येथील नवसमाज सोसायटीमध्ये एक आनंदी, समाधानी कुटुंब राहत होते. श्री. सीताराम लाड AIR INDIA मध्ये उच्च पदावर नोकरी करत होते. सौ. मीरा लाड या निवृत्त शिक्षिका होत्या. (आपल्या जुळ्या मुलांच्या संगोपनासाठी त्यांनी नोकरी सोडली होती.) राजीव आणि रजन ही त्यांची जुळी मुलं अतिशय देखणी आणि हुशार होती. राजीव सेठ जी. एस. मेडिकल कॉलेजमध्ये थर्ड M.B.B.S. मध्ये शिकत होता. रजन B.Com. झाली होती आणि ऑक्टोबर १९८२ मध्ये तिच लग्न झालं होतं. एकूण काय, दृष्ट लागेल असं हे कुटुंब होतं .... पण त्यांच सुख नियतीला बघवल नाही. रजनच्या लग्नानंतर एका आठवड्यातच राजीवचा आकस्मित मृत्यू झाला. या मृत्युचा घाव पूर्णपणे भरायच्या आतच, सहा महिने पूर्ण होण्याआधी रजन ही SLE या अतिशय दुर्मिळ आजाराला बळी पडली. दोन्ही तरुण मुलांच्या मृत्यूनंतर कुठचंही दांपत्य कोलमडून पडलं असतं. परंतु पूर्वाश्रमी सेवादलाशी सलग्न असलेल्या मीराताई आणि नामस्मरणामध्ये बुडून गेलेले लाडकाका हे दोघेही वेगळ्याच मुशीतून घडले होते. स्वत:चं दु:ख बाजूला ठेवून दुसऱ्यांना आनंद देण्याचे व्रत त्यांनी घेतले आणि मीराताईंनी पनवेल, नेरे येथील कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवन येथे राहून समाजसेवेला सुरुवात केली व लाडकाकांनी आपले गुरु-गुरुदेव रानडे यांच्या साहित्याचा प्रसार करायला सुरुवात केली.



दोन्ही मुलं लहान असतानाच मीराताईंनी ठरवल होतं की मुलं स्वतंत्र झाल्यानंतर समाजसेवेला वाहून घ्यायचं. ‘सेवादलामधील’ ‘सेवा’ त्यांच्या रक्तात मुरलेली होतीच; तेव्हा इतकं पराकोटीचं दु:ख आपल्या हृदयात लपवून




त्यांनी शांतिवनामध्ये वेगवेगळ्या विभागांमध्ये काम करायला प्रारंभ केला. हे काम करत असताना एकदा त्यांची नेमणूक वृद्धाश्रमाच्या कार्यकारी मंडळावर झाली. वृद्धाश्रमाचं काम करत असताना त्यांच्या असं लक्षात आलं की चालत्या बोलत्या वृद्धांना सामावून घेण्यासाठी अनेक वृद्धाश्रम उपलब्ध आहेत; पण जे वृद्ध अंथरुणाला खिळलेले आहेत किंवा जे स्वतंत्रपणे जगू शकत नाहीत त्यांच्यासाठी कुठलीही सेवा उपलब्ध नाही. अशा मंडळींचे छोट्या कुटुंबामध्ये अतिशय हाल होतात आणि त्यांची देखरेख करणाऱ्या कुटुंबियांवर फार मोठा भार पडतो. त्यातूनच मीराताईंच्या मनात



आधारघराची संकल्पना साकारली.

ज्या वृद्धांना किंवा कोणाही व्यक्तीला स्वत:ची स्वत: काळजी घेता येत नाही, अशांना आधार देणारं प्रेमळ घर म्हणजे ‘आधारघर’. लाड दांपत्याने स्वत:ची सर्व पुंजी घालून (पुढे अगदी पार्ल्यातलं घर सुद्धा विकून) आधारघराची स्थापना केली. त्यासाठी त्यांनी ‘Rajeev Rajan Lad Trust’ स्थापन केला. सुरुवातीच्या काळात पुरेसे मदतनीस उपलब्ध नव्हते, तेव्हा मीराताईंनी पडेल ती कामे केलेली आहेत. (अगदी जमिनीवर पडलेली विष्ठा उचलण्याचे काम सुद्धा) रात्र-रात्र जागरणं केली आहेत. हळूहळू आधारघराचं बस्तान बसायला लागलं. रहिवाशांची संख्या वाढू लागली आणि प्रतीक्षा यादी वरची नावे वाढायला लागली म्हणून राजीव रजन लाड ट्रस्टने पुण्याजवळ खैरेवाडी येथे जागा घेऊन तेथेही अशीच सेवा सुरु केली आहे. या दोन्ही ठिकाणी अतिशय वाजवी दरात सेवा दिली जाते. खैरेवाडी येथे तर मिळणाऱ्या पैशापेक्षा जवळ जवळ 30% जास्त खर्चाचा भार ट्रस्टला उचलावा लागतो. आधारघराच्या स्थापनेचं हे २५वं वर्ष आहे. गेल्या वर्षी ८९ वर्षांच्या लाडकाकांचं निधन झालं. मीराताई आता ८८ वर्षांच्या आहेत, पण अजूनही आधारघराच्या कामकाजात त्यांचा सक्रीय सहभाग असतो.

माझा लाड कुटुंबाशी संबंध शाळेपासून आहे. राजीव, रजन आणि मी पार्ले टिळक विद्यालयात एकाच वर्गात होतो. पुढे जी. एस. मेडिकल कॉलेजमध्ये राजीव आणि मी एकत्र होतो. शाळेत आमच्याबरोबर असलेले श्री. गिरीश कर्णिक राजीव-रजन लाड ट्रस्टचे मानद ट्रस्टी आहेत.

खैरेवाडी येथे सध्या १२ निवासींची



राहण्याची सोय आहे. त्याबरोबरच आजूबाजूच्या परिसरातील लोकांसाठी वेगवेगळी आरोग्य शिबिरेही येथे घेतली जातात. खैरेवाडी येथील निवासींची संख्या वाढवण्याची संस्थेची इच्छा आहे. त्यासाठी दोन इमारती बांधण्याची आवश्यकता आहे. या कामासाठी ट्रस्टला आर्थिक मदतीची गरज आहे. नवीन इमारतींचे बांधकाम, कर्मचारी, वसतीगृह, विद्युत जनित्र तसेच विविध उपकरणे यासाठी सुमारे २ कोटी रुपयांची गरज आहे. त्यासाठी इच्छुकांनी भरघोस देणगी देऊन या समाजकार्याला हातभार लावावा अशी विनंती ट्रस्टतर्फे करण्यात येत आहे. सर्व देणग्या आयकर नियम ८० जी खाली करमुक्त आहेत. यासंदर्भात अधिक माहितीसाठी संस्थेचे ट्रस्टी श्री. गिरीश कर्णिक, ठाणे (९८२०२६०२२९) किंवा सौ. सुप्रिया घोटगे, विलेपार्ले (९८२०९१०११५) यांच्याशी संपर्क साधता येईल.

राजीव रजन लाड ट्रस्टच्या आगामी कार्यासाठी त्यांना शुभेच्छा !

डॉ. अंजली भाटवडेकर
९८२०४९५६४४



# पार्ल्याचा नरिमन पॉईंट :सुभाष रोड!

२०२२ च्या जानेवारी महिन्यापासून आपण सुरु केलेल्या विलेपार्ल्यातील मार्गांच्या माहितीपर लेखांच्या उपक्रमाला पार्लेकरांनी भरभरून दाद दिली आहे, त्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.

आमच्या प्रत्येक लेखानंतर बरेच पार्लेकर आम्हाला फोन करून आपापले अभिप्राय कळवतात. त्यात एक अभिप्राय विशेषत्वाने समाईक असतो. तो म्हणजे, मार्गांवरील लेख मालिकेने वाचकांच्या गतकाळच्या आठवणी जाग्या झाल्या, तसेच त्यांना माहीत नसलेल्याही काही गोष्टी अवगत झाल्या. खरेच, रस्त्यांशी आपले नाते अगदी तसेच असते, जसे आपल्या शरीराचे आपल्या रक्तवाहिन्यांशी!

आजपर्यंत आपण हनुमान रोड, नेहरू रोड, महंत रोड आणि प्रार्थना समाज रोड या सर्वसाधारणपणे पूर्व-पश्चिम जाणाऱ्या आणि बऱ्याच अंशी सरळसोट मार्गांची माहिती पाहिली.

या लेखामध्ये आपण, थोड्या हटके असणाऱ्या, पार्ल्यातील पार्ले टिळक विद्यालयाच्या जवळ, महात्मा गांधी मार्गापासून सुरू होऊन थोडे सरळ पूर्वेला जाऊन नंतर वळणावळणाने पार्ल्याच्या ईशान्येला जाऊन शेवटी अंधेरी सहार मार्गाला जाऊन मिळणाऱ्या सुभाष रोडची माहिती घेणार आहोत. या सुभाष रोडच्या नावामागची पूर्वपीठिका जाणण्याचा आम्ही भरपूर प्रयत्न केला, परंतु त्यात आम्हाला तितकेसे यश आले नाही. स्वातंत्र्यपूर्व कालात विलेपार्ल्यातील रस्त्यांना बऱ्याच देशभक्तांची नावे दिली गेली, जसे की नेहरू रोड, महात्मा गांधी रोड. त्याप्रमाणे या मार्गाचे नाव नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ठेवले गेले असावे असा आम्ही कयास बांधला आहे. त्या काळी विलेपार्ले हा स्वातंत्र्यसैनिकांचा एक मोठा गड बनून राहिला होता. १९३० मध्ये सुभाष चंद्र बोस हे टिळक मंदिरामध्ये आले होते आणि त्यांनी येथे भाषणही केले होते. अर्थात त्या गोष्टीचा या मार्गाला सुभाष रोड हे नाव देण्याचा संबंध आहे की नाही हे मात्र आम्हास अद्याप कळलेले नाही. जे काही असेल ते असो, एक गोष्ट वाचून मात्र तुम्हाला नक्कीच गंमत वाटेल. ती ही की, सुभाष रोडचे पहिले नाव सोनारी रोड असे होते! सुभाष रोडच्या नावामागची पूर्वपिठीका कोणाला माहित असल्यास त्यांनी आमच्याशी कृपया संपर्क साधावा.

तर मंडळी, महात्मा गांधी मार्गापासून पार्ले टिळक माध्यमिक विद्यालयाच्या समोरून



जाणारा सुभाष मार्ग, पुढे रमाबाई परांजपे बालमंदिर उजव्या बाजूला ठेवून डाव्या बाजूला जेथे वळतो तेथे, पार्ले टिळकच्या विद्यार्थ्यांचे युनिफॉर्म वर्षानुवर्षे बनवणारे वर्मा टेलर्स यांचे प्रसिद्ध दुकान डाव्या बाजूला आहे.

त्याच्या लगेच पुढे सुभाष रोड परत उजवीकडे वळण घेतो. या कोपऱ्यावर डाव्या बाजूला पार्ल्यातील सुप्रसिद्ध कांचन डेरी आहे. तसेच थोडे पुढे गेले की उजव्या बाजूला बाबुराव परांजपे यांनी बांधलेली रामानंद सोसायटी. मध्यमवर्गीय मराठी माणसाला परवडेल अशा ज्या अनेक इमारती किंवा इमारतींचे समूह बाबुरावांनी बांधले, त्यातला रामानंद सोसायटी हा एक महत्त्वाचा इमारत समूह! आणखी थोडे पुढे गेले की सुभाष रोड एकदम काटकोनात डावीकडे वळतो. ९० अंशात वळणारा विलेपार्ल्यातील हा एकमेव मार्ग असावा! या कोपऱ्यावरती रामांजनेय देवस्थान आहे. हे मंदिर, मद्रासी रामाचे मंदिर म्हणून पार्लेकरांमध्ये सुविदित आहे. श्री लक्ष्मी नारायण स्वामी यांनी हे मंदिर १९३६ मध्ये बांधले. मंदिर परिसर मुंबईच्या मानाने बऱ्यापैकी विस्तीर्ण असून



आवारामध्ये श्रीराम, लक्ष्मण, सीता यांचे मंदिर तसेच हनुमंताचे वेगळे मंदिर आहे. देवस्थान तेथे एक गोशाळा सुद्धा चालवते. दाक्षिणात्य पद्धतीचे असलेले हे मंदिर दर रामनवमीला भक्तगणांनी गजबजून जाते. रामाचा एक, दाक्षिणात्य पद्धतीचा लाकडी रथ मंदिर परिसरात ठेवलेला आहे. हा रथ रामनवमीच्यादिवशी पार्ल्यामधून फिरवला जातो.

येथेच समोर कोपऱ्यावर महिला संघ संस्थेचे माधवराव भागवत माध्यमिक विद्यालय आणि



महाविद्यालय आहे. मंगलाताई आणि माधवराव भागवत यांनी १९५२ साली केवळ २५ विद्यार्थ्यांना घेऊन सुरू केलेल्या या विद्यामंदिराचा आता वटवृक्ष झाला आहे.

पुढे डाव्या बाजूला, अगदी अलिकडे अलिकडेपर्यंत साठ्ये कुटुंबीयांच्या, प्रसिद्ध युनायटेड इंक या कंपनीचे उत्पादन केंद्र होते. श्री विनायकराव साठ्ये यांनी १९२८ साली फिनेल आणि इतर तेले अशा नित्योपयोगी वस्तूंचे उत्पादन सुरू केले होते. पुढे त्यांचे सुपुत्र शरदकुमार साठ्ये हे इंग्लंडहून उच्च शिक्षण घेऊन आल्यानंतर त्यांनी १९३९ साली या कंपनीची स्थापना केली. छपाईची शाई व रोलर्स यांचे उत्पादन येथे होत असे. आमच्या



माहितीप्रमाणे कारखाना आता तळोजा येथे हलवला आहे आणि आता सुभाष मार्गावर कंपनीचे फक्त कार्यालय आहे.

याच मार्गावर विलेपार्ल्यातील दोन प्रसिद्ध व्यक्ती राहायच्या. एक म्हणजे जीवन विकास केंद्राचे संस्थापक श्री. सदानंद दणाईत आणि दुसरे म्हणजे श्री. बलभीमराव केसकर! श्रीयुत सदानंद दणाईत यांचे कार्य जीवन विकास केंद्राच्या रूपाने आपण सारे पाहत आहोतच. श्री बलभीमराव केसकर हेही एक वैशिष्ट्यपूर्ण पार्लेकर होते. मूळचे सोलापूरचे असलेले भीमराव नोकरीनिमित्त राजकोट, अहमदाबाद, लाहोर, मुलतान, कलकत्ता आणि अशा अनेक ठिकाणी फिरून आले होते. त्यांची विचारसरणी अत्यंत पुरोगामी आणि सुधारक मतांची होती. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली होती. एक गमतीची गोष्ट म्हणजे, आचार्य अत्रे यांचा विवाह सौ सुधाताई यांच्याशी भीमरावांनीच लावून दिला होता. सौ. सुधाताई या, बलभीमराव यांच्या पत्नी सौ. आनंदीबाई केसकर यांच्या विद्यार्थिनी होत्या. महात्मा गांधी मार्गावरचे आनंदीबाई केसकर उद्यान हे भीमरावांच्या पत्नीच्या स्मृतिप्रीत्यर्थ बांधले गेले आहे. बलभीमरावांनी त्याकाळी सुभाष मार्गावर म्हणजेच पूर्वीच्या सोनारी मार्गावर पार्ले टिळक विद्यालयाजवळ एक मोठे दुमजली घर बांधले होते.

पुढे डाव्या बाजूला बऱ्याच कंपन्यांची कार्यालये झाली आहेत. जुन्या इमारती पाडून नवीन इमारती उभ्या राहिल्या आहेत. थोडे पुढे उजव्या हाताला, एक उद्यमशील पार्लेकर श्री. वीरकर यांचे फुड पॉईंट हे दर्जेदार आणि विशेष करून मराठी खाद्यपदार्थांचे दुकान आहे. त्यापुढे जेथे सुभाष मार्ग सहार मार्गाला मिळतो त्या कोपऱ्यावर आपले अस्सल मराठमोळे, आदरणीय आबासाहेब गरवारे यांनी स्थापन केलेली गरवारे पॉलिस्टर ही कंपनी आहे. अर्थात मूळ वास्तू जरी अजूनही अस्तित्वात असली तरी आता हा कारखाना संभाजीनगर येथे हलविण्यात आला आहे.

अशाप्रकारे पार्ले टिळक समूहाच्या विद्यालयांपासून सुरू झालेला सुभाष मार्ग गरवारे पॉलिस्टर सारख्या प्रतिष्ठित कंपनीपर्यंत येऊन समाप्त होतो. आपल्या आजूबाजूला विद्यालये, ऐतिहासिक सोसायट्या, मोठ्या कंपन्यांची कार्यालये, काही मोठी हॉटेल्स बाळगत, वळणावळणाने पश्चिमेकडून ईशान्येकडे सरकणारा सुभाष रोड हा अगदीच हटके आहे. अलीकडे, त्याच्या ईशान्येकडील टोकाला झालेली मोठमोठ्या कंपन्यांची कार्यालये पाहता या मार्गाला पार्ल्याचा नरिमन पॉइंट म्हटले तरी वावगे ठरू नये. काही उत्साही पार्लेकरांनी त्याचे अगोदरच असे नामकरण करून टाकले आहे असेही आमच्या कानावर आले आहे!!!

(मंडळी, या निमित्ताने वाचकांना विशेषत: ज्येष्ठ वाचकांना एक आवाहन: विलेपार्ल्यातील रस्त्यांचा अभ्यास करण्यास आम्ही जेव्हा सुरुवात केली तेव्हा आमच्या असे लक्षात आले की याविषयी फारच अपुरी माहिती उपलब्ध आहे. विलेपार्ल्याच्या इतिहासावरील काही पुस्तकांचा आधार घेतो, तसेच काही ज्येष्ठ नागरिकांशी बोलून माहिती मिळवण्याचा प्रयत्न करतो. आपल्यापैकी कुणाला येथील रस्त्यांची माहिती, त्यांचा इतिहास वा त्यांची काही वैशिष्ट्ये माहीत असतील तर त्यांनी आम्हाला फोन करून अवश्य कळवावी ही विनंती. धन्यवाद)

**दादासाहेब दापोलीकर**
९९६७८४०००५



# मार्जार कुळातील मोठे प्राणी (बिगकॅट्स) – बिबळ्या

आसपास

‘तोपहा’, सुमारे ५०मी. अंतरावरील झाडाकडे अंगुली निर्देश करत आमचा गाईड सांगत होता,’ जमिनीपासून चवथ्या आडव्या फांदीवर बिबळ्या झोपला आहे’. पंधरा वर्षांपूर्वी पश्चिम घाटातील काबिनी संरक्षित अभयारण्यातील एका सायंकाळची ही गोष्ट. खरं सांगायचे तर आम्हा जंगल प्रेमींना अगदी डोळे फाडून पाहिले तरी काही दिसत नव्हते. झाडाची फांदी पानांनी बहुतांशी झाकली होती. चालकाने गाडी थोडी पुढे घेऊन कोन बदलला. मी चालकाच्या टपावर चढून दुर्बिणीतून पाहिल्यावर आजूबाजूच्या रंग-संगतीत बेमालूमपणे मिसळलेला बिबळ्या मला दिसला. ६००मी.मी. ची लेन्स लावून फोटो काढून लोकांना दाखविल्यावर मात्र सर्वांना तो कोठे बसला आहे ते कळले आणि सहसा न दिसणाऱ्या पण अतिशय सुंदर दिसणाऱ्या बिबळ्याचे दर्शन झाले.



बिबळ्याचे दर्शन झाले तरी वन्य जनावरांच्या बाबतीत ‘दुरून डोंगर साजरे’ उक्ती अतिशय चुकीची ठरते. त्याची रंग-संगती, शरीरयष्टी, चालण्याची ढब, दरारा, व्यक्तीमत्व या गोष्टी अनुभवायला जवळून पाहणे ही एक पर्वणी असते. प्राणी जवळून पाहिल्या शिवाय आपले मन तृप्त होतंच नाही. त्यात वाघ, सिंह, बिबळ्या असल्या प्राण्यांविषयी तर विचारूच नका.

या प्रसंगानंतर बिबळ्या या मार्जार कुळातील सौंदर्यवान प्राण्याने मला भुरळच घातली. त्याच्या दर्शनापायी मी स्वत: आणि बरोबर अनेक लोकांना घेऊन बंदीपूर, पेंच, ताडोबा, नागझिरा, काझीरंगा, केनयातील मसाईमारा, सांबुरू अशा अनेक अभयारण्यांना भेटी दिल्या. शिकार खाताना, झाडावर बसून झोप काढताना, झाडावरून भक्ष हेरताना, आपली हद्द सुनिश्चित करताना, जंगल वाटेवरून चालताना मी अनेक बिबळ्यांना पहिले आहे. बिबळ्या हा निसर्गाचा एक चमत्कार आहे याची मलातरी पूर्ण खात्री पटली आहे. बिबळ्याला पँथर किंवा बोली भाषेत तेंदू सुद्धा म्हणतात.

पिवळसर रंग, पोटाकडील पांढरा भाग, मोठे डोके, अंगावरील काळ्या-चॉकलेटी ठिपक्यांचे संच, बुटके पाय, लांबुडके शरीर हे त्याचे वर्णन खूपच निरस वाटते. प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय बिबळ्या किती सुंदर आहे ते समजणारच नाही. त्याचे सौंदर्य कागदावर शब्द रूपात उतरवणे हे अतिशय कठीण. शौर्याच्या बाबतीत बिबळ्या इतर कुठल्याही प्राण्यांसमोर हार मानणार नाही. साधारण ७५ किलो वजन, १.२ मी. लांबी असलेली शरीर यष्टी, रंग आणि त्यावरील ठिपके त्याला अगदी छोट्यातीलछोट्या जागेत लपून बसायला मदत करतात. बिबळ्याची नजर आणि कान अतिशय तीक्ष्ण असतात. वाघापेक्षा आकाराने लहान आणि कमी ताकदवान असल्याने आकाराने लहान प्राणी म्हणजे ससा, हरीण, रानडुक्कर, माकडे हे त्याचे खाद्य. बिबळ्याला काळोखात ही सुस्पष्ट दिसते त्यामुळे बहुतेकदा तो रात्री शिकार करतो. शिकार केल्यानंतर मात्र अनेक ऐत खाऊ उदा. वाघ, सिंह, जंगली कुत्रे, तरसे त्याची शिकार पळवायला टपलेले असतात. आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय असा प्रकार अनेकदा घडतो. आपण मेहनतीने केलेल्या शिकारीचे रक्षण करण्यासाठी शिकार तोंडात पकडून बिबळ्या झाडावर चढतो आणि झाडाच्या बेचक्यात पडणार नाही याची खात्री करत ठेऊन देतो. शिकारीतील थोडा भाग खाऊन मग वरच्या फांदीवर आराम करतो. स्वत:च्या वजनाच्या दुप्पट वजनदार प्राणीही सहजगत्या झाडावर नेऊन ठेवण्यात तो पटाईत आहे.

बिबळ्याला शिकार करताना ज्याने पाहिले तो भाग्यवानच. पावलांचा बिलकुल आवाज होऊ न देता, प्रत्येक छोटे-मोठे झुडूप, गवत, दगड, खळग्याचा आडोसा घेत आणि जमिनीला पोट जवळ जवळ घासत हळू-हळू पुढे सरकतो. शिकारीपासून अगदी ७-८ फुटांवर येईपर्यंत सावज बेसावध असते. मग मात्र विजेच्या चपळाईने तो शेवटची चढाई करतो आणि सावजाची मान बरोबर श्वासनलिकेजवळ पकडतो. भक्ष्याचा श्वास बंद झाल्यामुळे ते खाली पडते. आपल्या अंगावर हे धूड न पडण्याची काळजी घेऊन तो चपळाईने पडण्याच्या मार्गातून दूर होतो. अशा मुळे तडफडणाऱ्या प्राण्याच्या खुरा पासूनही त्याचे रक्षण होते.

इतर मार्जार कुळातील प्राण्यांप्रमाणे जन्मत:



पिल्लांचे डोळे मिटलेले असतात. अशा वेळी आई त्यांची खूप काळजी घेते. डोळे उघडल्यावर मग दूध पाजून आणि नंतर अर्धवट पचलेले मांस ओकून ती त्यांची अगदी शब्दश: अर्थाने उष्टावण करते. हळू हळू मांसाचे छोटे-छोटे तुकडे खायला देते. मग मारलेले संपूर्ण प्राणी घेऊन येऊन त्याची कातडी कशी सोलावी, मांसाचे तुकडे कसे करावेत याचा वस्तुपाठ घालून देते. ८-१० महिन्यांपर्यंत खूप काळजी घ्यावी लागते. पिल्ले अधाशासारखे खाऊन अतिसाराने आजारी पडू शकतात. असे झाले तर त्यांचा वेदनामय मृत्यू ठरलेलाच. अर्थात आईचे बारीक लक्ष असल्याने हा अनर्थ टळतो. पुढे आई पिलांना शिकारीवर घेऊन जाऊन प्रत्यक्ष शिकारीचे धडे देते. आईला शिकार करताना तिचे निरीक्षण करणे, मग आईने गळा पकडलेल्या सावजाला चावे आणि मग प्रत्यक्ष सहभाग असे पायरी-पायरीने धडे गिरवून घेत आई पिलांना शिकार कलेत पारंगत करते. कालांतराने वयात आलेली पिले आपले नशीब आजमावण्यासाठी निघून जातात.

आज संपूर्ण भारतात सुमारे २०,००० बिबळे आहेत. म्हणजे वाघांच्या संख्येच्या जवळ जवळ दहापट. वाढत्या लोकसंख्येला निवारा आणि अन्न मिळावे यासाठी जंगलतोड करून जमीन लागवडीखाली आणल्यामुळे पशुपक्षांचा अधिवास संकुचित होत चालला आहे. वर्षानुवर्षे चाललेली अवैध शिकार, पर्यावरणाचा आणि अधिवासाचा ऱ्हास यास्तव वाघ-सिंह यांची संख्या चिंता करावी इतकी कमी आहे. या पार्श्वभूमीवर बिबळ्यांची संख्या खूप चांगली नसली तरी आश्चर्य वाटावे इतकी बरी आहे. छोट्या जागेत लपण्याची क्षमता, धुर्तपणा, आजुबाजूच्या रंग संगतीत मिसळण्यासाठी निसर्गाने बहाल केलेली रंगसंगती, चपळता या जोरावर बिबळ्या आपले अस्तित्व कसे बसे टिकवून आहे. परंतु मानवाने अतिक्रमण करून जंगलात



वस्ती केली आहे. त्यातच भक्ष्याच्या शोधात फिरत असेलेल्या बिबळ्यांना कुत्रे, डुक्करे, बदके, कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या, वासरे अशी पाळीव जनावरे आकर्षित करतात. हे सर्व प्राणी शिकार करण्यास जंगलात राहणाऱ्या प्राण्यांपेक्षा त्यामानाने थोडे सोपे असतात. बिबळे मग गावाच्या आजूबाजूला वस्ती करून राहतात. पाळीव प्राण्यांची शिकार, माणूस जवळ आल्यावर बिबळ्याचे भितीपोटी किंवा स्वसंरक्षणार्थ हल्ले या मधून मग सुरु होतो मानव आणि श्वापदे यांच्यातील संघर्ष! प्रगत हत्यारे,



पान ७ वर




For More Details, Contact:
GLOBE WANDERER
| Holidays | Visa | Hotel Booking | Insurance | Business Travel | Foreign Exchange | Air Ticket
Shop No. 5, Govardhan CHS., Dixit Road Extn. Nr. Utkarsh Mandal Circle, Vile Parle (E), Mumbai - 400 057.
Cell: +91 79776 33695 / 79774 49817 / 83559 04202 Email: globlewanderer365@gmail.com

# चेंगीज खानाचा देश

देशोदेशी

शाळेत बहुदा सहावी-सातवीत असताना इतिहासाच्या पुस्तकात चेंगीज खान आणि त्याच्या साम्राज्याची थोडीशी माहिती वाचनात आली होती. त्यात नक्की काय शब्द वापरले होते आणि काय वर्णन होतं ते काही आठवत नाही. पण ते वाचून मनात ठसलेलं चित्रं मात्र होतं, वाटेत येईल ते बेचिराख करत विद्युत वेगाने पुढे जाणाऱ्या टोळ धाडीचं! एकूणच सुरुवातीला जे काही वाचनात आलं त्यात चेंगीज खानाची प्रतिमा ही क्रूर कर्मा, लुटारु सैन्याचा रक्त पिपासू अधिपती अशीच रंगविलेली होती. अगदी चंगेझ खान ह्या १९५७ सालच्या हिंदी सिनेमात शेख मुख्तारने रंगविलेल्या किंवा १९६५ सालच्या हॉलिवूडच्या Genghis Khan ह्या सिनेमात ओमार शरिफने साकारलेल्या चेंगीज खानाचं व्यक्तिमत्व ही ह्या प्रतिमेला सुसंगत असंच होतं.

पाच-सहा वर्षांपूर्वी जेंव्हा मी मंगोलियाला जायचा बेत केला, तेंव्हा जिथे जाणार त्याबद्दल काहीतरी थोडीफार माहिती असलेली बरी म्हणून मंगोलियाच्या इतिहासाची तोंड ओळख करून घ्यायला जरा सुरुवात केली आणि आश्चर्याचे अनेक धक्के मला बसू लागले. चेंगीज खानाची निव्वळ 'विध्वंसक' अशी प्रतिमा थोडी त्याच्यावर अन्याय करणारी आहे असं वाटू लागलं. त्याने पूर्वेच्या तांगुट आणि जिन साम्राज्यांपासून पश्चिमेला पोलंड पर्यंतची राज्यें एकामागून एक उद्धवस्त केली हे तर खरंच, पण त्याच बरोबर मानवी इतिहासातील आज पर्यंतचं सर्वात मोठं 'एकसंध' साम्राज्य त्या जागी निर्माण केलं हेही तितकंच खरं (एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिश साम्राज्याचं एकूण क्षेत्रफळ जरी चेंगीज खानाच्या साम्राज्यपेक्षा जास्त असलं तरी, त्याचा भूभाग अनेक तुकड्यात विभागलेला होता). एका बाजूने त्याच्या लष्करी मोहिमांमध्ये हजारो/लाखो लोक मारले गेले हे खरंच. पण त्याच बरोबर ज्या राजे-रजवाड्यांना त्याने कंठस्नान घातलं तेही काही गंगेचं पाणी पिऊन राज्य करणारे नव्हते. त्यामुळे काराखिताई (Qara Khitai - सध्याच्या चीनच्या पश्चिमेचा प्रदेश) साम्राज्याचा जेंव्हा चेंगीज खानाच्या 'निष्ठूर' सैन्याने पाडाव केला तेंव्हा तेथील उघूर (Uyghur) ह्या बौद्ध जमातीने त्यांचं आपले तारणहार म्हणूनच स्वागत केलं हे ही तितकंच खरं!

परंतु सर्वात महत्वाचं म्हणजे हे मंगोल साम्राज्य आश्चर्य वाटावं एव्हढं उदार मतवादी, सर्व समावेशक तत्वांवर आधारित होतं. संपूर्ण साम्राज्यात समान नागरी आणि लष्करी कायदा निश्चित करणारी प्रणाली चेंगीज खानाने निर्माण केली ('यासा'नावाची). धर्म, वंश, कुटुंब / जमात अश्या बाबींना राज्य-शकटात स्थान नव्हतं. कोणालाही (अगदी नव्याने जिंकलेल्या पूर्वीच्या शत्रू-राज्यातील नागरिकांना सुद्धा) स्वत:च्या निव्वळ अंगभूत गुणांच्या बळावर राज्य-प्रशासनात सर्वोच्च पदापर्यंत पोचणं शक्य होतं. शिक्षक आणि वैद्य अशा व्यावसायिकांना खास कर सवलती दिल्या जात. चेंगीज खान स्वत : 'तेंगरिझम' ह्या प्राचीन, मूलत: निसर्ग पूजक धर्माचा अनुयायी होता. ('खान' ही मंगोलियन 'पदवी' होती. त्याचा कुठल्याही धर्माशी संबंध नव्हता.) पण त्याच्या मंगोल साम्राज्यासारखं सर्वार्थाने धर्म निरपेक्ष राज्य त्याच्या आधी (आणि कदाचित अगदी आजपर्यंत सुद्धा) प्रस्थापित झालेलं आपल्याला इतिहासात दिसत नाही.

पण तरी सुद्धा पूर्वी पासून मनात ठसलेली चेंगीज खानाची 'कर्दनकाळ' ही प्रतिमा पूर्ण पणे पुसली नव्हती. त्यामुळे उलान बाटरला (मंगोलियाची राजधानी) पोचल्यावर जिकडे तिकडे चेंगीज खानाची स्मारकं (अगदी शहराशेजारच्या टेकडीवर सुद्धा टेकडीचा दर्शनी भाग पूर्ण भरेल एव्हढ्या मोठ्या चेंगीझ खानाच्या चेहेऱ्या सकट - **पहिला फोटो)** दिसल्यावर



सुरुवातीला आश्चर्याचे धक्के बसलेच. जसजसा स्थानिक लोकांशी संवाद झाला तसतसं चेंगीज खानाचं मंगोलियन जनमानसातील महत्वही लक्षात येऊ लागलं. उलान बाटर मधील सर्वात भव्य आणि लक्षवेधक इमारत आहे चेंगीज खानाचं स्मारक - मध्यभागी चेंगीज खान स्वत:, एकीकडे ओगदेई खान हा त्याचा मुलगा आणि दुसरीकडे कुब्लाई खान हा नातू. ही इमारत म्हणजे मंगोलियाची संसद, राष्ट्रपतींचं कार्यालय, मंत्रालय वगैरे असलेल्या गव्हर्नमेंट हाऊसचा दर्शनी भाग. **(दुसरा आणि तिसरा फोटो).**





कुब्लाई खानाच्या मृत्यू नंतर मात्र मंगोलियाच्या नशिबी ते पूर्वीचे वैभवाचे दिवस कधीच आले नाही. पुढील अनेक शतके आधी सतत चालणारी यादवी युद्धं, चीनच्या चिंग साम्राज्याने मंगोलिया जिंकून केलेली दडपशाही, स्टालिनच्या काळात सोविएत रशियाने केलेल्या कत्तली, अश्या घडामोडीत मंगोलिया सतत चिरडला गेला. आधुनिक काळातील मंगोलियाचा सर्वात मोठा वीर पुरुष म्हणजे सुखबाटर **(चौथा फोटो त्याच्या स्मारकाचा).** त्याने विखुरलेल्या मंगोलियन टोळ्यांची एकजूट करून सोविएत



रशियाच्या मदतीने, चिनी सत्तेचं जोखड मंगोलियाच्या मानगुटीवरून झुगारून दिलं. मात्र



हा स्वातंत्र्याचा आनंद काही फार काळ टिकला नाही. रशियाचं बाहुलं म्हणून प्रस्थापित झालेल्या कम्युनिस्ट राजवटीत प्रजेवरील अत्याचार मागील पानावरुन पुढे चालूच राहिलेते १९९२ साली नवीन राज्य घटना अस्तित्वात येऊन १९९६ साली पहिलं खरंखुरं लोकशाही सरकार प्रस्थापित होईपर्यंत. (ह्या दडपशाही पासून मिळालेल्या मुक्तीचं हृद्य स्मारकही चेंगीज खानाच्या स्मारकाजवळच आहे - **पाचवा फोटो).**

आजच्या मंगोलिया मध्ये त्यामुळे शतकानुशतके चालत आलेली भटक्या जमातींची जीवन शैली, श्रद्धाळू बौद्ध आचार-विचार आणि आधुनिक औद्योगिकरणामुळे समाज जीवनात होणारी परिवर्तने ह्यांचं जटिल मिश्रण पाहायला मिळतं. अजूनही २५% जनता घोड्याच्या पाठीवर आपला संसार लादून भटकं जीवन जगते. **(सहावा फोटो - गीर नावाच्या तंबूंची अस्थायी छावणी).** उलान बटार मध्ये



फिरताना अत्याधुनिक ऑफिस कॉम्प्लेक्सच्या आवाराला लागूनच चोजिन लामाचं शेकडो वर्ष जुनं देऊळ दिसतं **(सातवा फोटो).** गानदान तेंग चिनलेनच्या भव्य बुद्ध मंदिराबरोबच पारंपरिक निसर्ग पूजक देव ऋषींची पूजा स्थळंही पाहायला मिळतात **(आठवा फोटो).**

पान ७ वर



पान ६ वरून

## चेंगीज खानाचा देश





मंगोलियाच्या आठवणी अनेक आहेत मात्र शब्द मर्यादेमुळे बाकी सर्व पुन्हा कधीतरी.

**सतीश जोशी**
९८२०२२८२७९

पान ५ वरून

## मार्जार कुळातील मोठे प्राणी (बिगकॅट्स) – बिबळ्या

**संजय देवस्थळी**
९८३३८६६४६२

## प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचा जिम्नॅस्टिक खेळाडू निशांत करंदीकर करणार वर्ल्ड स्कूल जिम्नॅस्टिक्स स्पर्धेसाठी भारताचे प्रतिनिधीत्व





छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचा आंतरराष्ट्रीय ख्यातीचा जिम्नॅस्टिक खेळाडू निशांत करंदीकर हा १३ ते २३ मे २०२२ या कालावधीत फ्रांस येथे होणाऱ्या 'आयएसएफ वर्ल्ड स्कूल जिम्नॅस्टिक्स स्पर्धा २०२२' साठी भारताचे प्रतिनिधीत्व करणार आहे.

निशांत १८ वर्षांचा असून तो साठ्ये महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. २०१४ पासून प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलात निशांत आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्सचा सराव करत आहे. त्याने ८ वर्षात एकूण २४ सुवर्ण, २६ रौप्य व १३ कांस्य पदके पटकावली आहेत. २०१७ मध्ये कोलकाता येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत १४ वर्षांखालील वयोगटात सुवर्ण पदक तसेच २०१९ मध्ये सूरत येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत निशांतने रौप्य पदक पटकावले आहे तसेच २०२१ मध्ये बांगलादेशमधील ढाका येथे झालेल्या साऊथ सेंट्रल एशियन चॅम्पीयनशीप आंतरराष्ट्रीय स्पर्धेत २ रौप्य आणि २ कांस्य पदके पटकावली आहेत.

निशांतला प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू, सचिव डॉ. मोहन अ. राणे. निशांतचे प्रशिक्षक शुभम गिरी, जिम्नॅस्टिकचे प्रशिक्षक शिवछत्रपती पुरस्कार विजेते हरीश परब आणि जिम्नॅस्टिक प्रशिक्षक नीलम बाबरदेसाई यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

मुंबईचे माजी महापौर-माजी आमदार डॉ. रमेश यशवंत प्रभू यांनी १९९८ साली प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल नावाचे एक रोपटे लावले त्या रोपट्याचा आज विशाल वटवृक्ष झाला आहे. सुरवातीला संकुलात असणाऱ्या जागतिक मापाच्या तलावात फक्त जलतरणाचे प्रशिक्षण दिले जात होते. आता या ठिकाणी जल तरणाबरोबर जिम्नॅस्टिक, एअर रायफल शुटिंग, क्रिकेट, फुटबॉल, पिकलबॉल, टेबल टेनिस , कराटे, ज्युडो, स्केटिंग, मल्लखांब, व्यायाम, स्पोर्ट्स रिकव्हरी सेन्टर, आदी क्रीडा प्रकारच्या खेळांचे प्रशिक्षण तज्ज्ञ प्रशिक्षकांडून दिले जात आहे. संकुलाचे अनेक खेळाडू, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, स्पर्धांमध्ये भाग घेत पदके मिळवीत आहेत, डॉ. रमेश प्रभू यांचे एक स्वप्न होते की माझ्या क्रीडा संकुलाच्या खेळाडूंनी ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करावे, आणि त्या दृष्टीने पदाधिकारी, विश्वस्त आणि प्रशिक्षक यांचे प्रयत्न सुरू आहेत.







# शांत समाधानी संगीतकार...




गुरूकुल

एक कळी उमलेचना, शिशिर संपला वसंत आला, अशी एक से एक मधुर भावगीतं.. जैसी गंगा वाहे, विष्णुमय जग..सारखे अभंग आणि सर्वांवर कडी म्हणजे सुप्रसिद्ध दुर्गा झाली गौरी.. या संगीत नाटकाचं खिळवून ठेवणारं संगीत देणारी संगीतकार जोडी, शांक-नील.. यापैकी डॉ. सुनील कट्टी, संगीत क्षेत्रात सुपरिचित व्यक्तिमत्त्व. सुनील सरांचा जन्म विलेपार्ले येथील. आई कै. श्रीमती विमलताई गिरगाव येथील काळाराम मंदिरातील प्रमुख पुजाऱ्याची मुलगी. घरात संगीताची सर्वांना आवड. विमलताईही शास्त्रीय संगीत शिकल्या होत्या. परंतु व्यावसायिक गाणं केलं नाही. घरी क्लास घेत असत. दरवर्षी होळीला हिराबाई बडोदेकर यांचं गाणं ऐकून कानात साठवून ठेवत. त्यांच्या काळातल्या संगीत विशारद असलेल्या विमल ताईंचा युनिव्हर्सिटीतील सर्वोच्च मार्कांचा रेकॉर्ड आतापर्यंत कोणीही मोडलेला नाही. सुनील सरांचे आजोबा तसेच आत्या कीर्तनकार. त्यांचे वडील श्री. माधवराव कट्टी कीर्तनाला तबल्याची साथ करत. सुनील सरांना दोन्हीकडून संगीताचा वारसा मिळाला. आजोबांना आपली सून गाणारी असावी असं वाटत होतं. त्यामुळे आईचं गाणं लग्नानंतरही चालू राहिलं.



घरात आईचे क्लास चालत. मुलींचं गाणं, त्या गात असलेल्या रागाचं स्वरूप, चलन वगैरे कानावर पडायचं. त्यामुळे राग मेंदूत घुसले होते. सरांनी गाण्याच्या परीक्षा दिल्या. परीक्षेपुरता आईजवळ बसून अभ्यास. बाकी कानसेन. आवाज फुटल्यावर गाता येईना म्हणून सतारीकडे वळले. थोरले बंधु श्री. शशांक कट्टी हे बाबुराव कुलकर्णी यांच्याकडून, नंतर सुप्रसिद्ध बासरी वादक श्री कमलाकर भाटवडेकर यांच्याकडून सतार शिकत होते. सुनील सर थोरल्या बंधूंकडून सतार शिकू लागले. संगीतक्षेत्र व्यवसाय म्हणून निवडायला घरातून विरोध होता. त्यामुळे मॅट्रिकनंतर सायन्सला ऍडमिशन घेतली. सुनील सर शाळेत असल्यापासून तबला वाजवत असत. मॅट्रिकच्या वर्षात असताना वाटलं, शास्त्रशुद्ध तबला शिकावा. मल्हारी कुलकर्णी हे बासरी वादक तबलाही वाजवत. ते घरी येऊन तबला शिकवू लागले. उस्ताद अहमदजान थिरकवाँ यांचं शिस्तबद्ध प्रस्तुतिकरण आवडत असे. त्यामुळे त्यांच्या कॅसेट्स जमवून प्रॅक्टिस करून स्वत:चं सोलो वादन बसवू लागले. ऑल इंडिया रेडिओ १८ ते २५ वयोगटासाठी शास्त्रीय वादनाच्या स्पर्धा घेत असे. त्यात १९७२ साली भाग घेतला. दोन्हीमध्ये मुंबईमधून सिलेक्ट झाले. नंतर रेकॉर्डिंग करून दिल्ली येथे फायनलला पाठवलं. त्यात तबल्यात पहिला क्रमांक आला. १९७५ साली सतारीत पहिला क्रमांक पटकावला. दोन्हीतील मास्टरीवर शिक्कामोर्तब झालं. अठराव्या वर्षापासून तबल्याचे क्लास घेतले. थोरल्या बंधुंना सतारीला साथ करत.

कॉलेजात असताना नीलाताई व श्री. रविंद्र भिडे, अविनाश प्रभावळकर आणि शशांक व सुनील कट्टी असा एक ग्रुप होता. पार्ले टिळक शाळेच्या सुवर्ण महोत्सवा निमित्त होणाऱ्या कार्यक्रमात या ग्रुपला अर्ध्या तासाचा एक कार्यक्रम बसवा असं सांगितलं गेलं. त्यावेळी कट्टी बंधुंनी नुकतीच संगीत दिग्दर्शनाच्या कामाला सुरुवात केली होती. काही स्वत:च्या रचना काही लोकप्रिय गाणी असा कार्यक्रम ठरवला. संगीत दिग्दर्शन कोणत्या नावाने करावं असा विचार चालू होता. आईने शांक-नील नाव सुचवलं. पुढे सगळा संगीत प्रवास याच नावाने झाला. दूरचित्रवाणीसाठी बरंच काम केलं. छोट्या मुलांचं वृंदगान, शब्दांच्या पलीकडले सारख्या कार्यक्रमात स्वत:च्या रचना सादर केल्या. पार्ल्यात विजय बोन्द्रे यांचा गॉसिप ग्रुप होता. ग्रुप तर्फे टिळक मंदिरासाठी नाटकं बसवली जात. त्यांच्यासाठी अडीच तासांचं पार्श्वसंगीत असलेलं पीन टू पियानो हे नाटक तसंच गुहागर, क्षितिजरेषा अशी काही नाटकं केली. त्याच काळात दादरला आविष्कार कडून बोलावणं आलं. सुलभाताई लहान मुलांसाठी नाटक दिग्दर्शित करत होत्या, आला अडाण्याचा गाडा. त्याचं संगीत केलं. त्यानंतर त्यांच्यासाठी अपना हाथ जगन्नाथ, पंचतंत्र, दुर्गा झाली गौरी अशा सांगीतिकांसाठी संगीत केलं. नृत्य दिग्दर्शन सुप्रसिद्ध नृत्य गुरु पार्वतीकुमार यांचं होतं. दुर्गा.. प्रचंड गाजलं. त्यानंतर अनेक व्यावसायिक नाटकांचं संगीत केलं. दुर्गाचं काम





संपत आलं तेव्हा Line In स्टुडिओचे रेकॉर्डिस्ट आशिष दीक्षित यांनी विचारलं, व्हिनस ऑडिओ कंपनीसाठी काम कराल का? आनंदाने हो म्हटलं. सुरुवातीला versions केली. उदा. रफी यांची गाणी अशोक खरे यांच्या आवाजात. रिस्पॉन्स चांगला मिळाला. पण शांक-नील यांना स्वत:चं संगीत करायचं होतं. ती ही संधी मिळाली. गणेशोत्सवासाठी दर वर्षी नवीन गाणी, दत्तजयंतीसाठी दत्ताची गीतं, कोळीगीतं, भावगीतं असं वेगवेगळं भरपूर काम केलं. व्हिनसने व्हिडिओ क्षेत्रात पाऊल टाकल्यावर व्हिनसबरोबर काम करणं थांबवलं. व्हिनसकरिता काम करताना लक्षात आलं, प्रत्येक वादक दोन दोन वाद्यं वाजवतात. त्यामुळे आपणही अजुन एक वाद्य शिकावं असं वाटलं. सतारीसारखं असलेलं तंतुवाद्य संतूर शिकावं असं ठरवलं. संतूर.. शततंत्री वीणा.. विशिष्ट काळ्यांनी वाजवायचं वाद्य. एक दिवस जाऊन विकत आणलं आणि शिकायला सुरुवात केली. सुनील सर जे जे वाद्य शिकत ते ध्यास घेतल्याप्रमाणे. त्यामुळे लवकरच त्यावर मास्टरी येत असे. दोन वर्षांत रेडिओसाठी ऑडिशन दिली. सुगम संगीतासाठी साथीला बोलावणं यायला सुरुवात झाली. रेडिओप्रमाणे संगीतकार लक्ष्मी प्यारे, रविंद्र जैन, मराठीत प्रभाकर पंडित, यशवंत देव यांच्याकडे सतार-संतूर वाजवायला बोलावत. व्हिनसची कामं वाढल्यावर साथीची कामं घेणं बंद केलं.

शिक्षण पूर्ण होता होता आपला कल कुठे आहे हे लक्षात आलं होतं त्यामुळे संगीत विशारद पदवीच्या जोरावर S.N.D.T युनिव्हर्सिटीत सतार प्राध्यापक म्हणून नोकरी घेतली. पुढे संगीत अलंकार, संगीतात M. A. या पदव्या संपादन केल्या. प्रत्येक वेळी सुवर्णपदक पटकावलं. P.Hd समान संगीताचार्य ही पदवी गुरुदेव विनायक बापट अवॉर्ड या सन्मानासह मिळवली. अशी सरांची संगीत कारकीर्द झळझळीत आहे. पदव्यांसह नोकरीतील उच्च पदांवर वाटचाल होत राहिली. शेवटची दहा वर्षे HOD संगीत विभाग या जागेवर काम केले. आपल्या कारकिर्दीदरम्यान वेगवेगळे उपक्रम राबवले. बाहेर संगीतकार म्हणून नाव होतं त्यामुळे त्या वेळच्या HOD डॉ प्रभाताई अत्रे यांच्याकडून खूप प्रोत्साहन आणि कौतुक मिळालं. वृंदगान प्रकार रूढ केला. सलग पाच वर्षे youth festival मध्ये झोनल आणि नॅशनल लेव्हलला पहिलं बक्षीस मिळवलं. आवड आहे पण गाणं शिकायचं राहून गेलंय अशांसाठी सुगम संगीताचे वर्ग सुरु केले. ते बारा वर्षं चालू होते. आता सतार प्राध्यापक म्हणून honorary काम करतात. तसेच घरी उपशास्त्रीय संगीताचे क्लास घेतात.

वृंदगान बसवताना वंदना शिरोडकर या अतिशय गुणी विद्यार्थिनीशी परिचय झाला. त्याचं रूपांतर स्नेहात आणि परिणीती विवाहात झाली. वंदनाताईही स्वत: संगीतात डॉक्टर आहेत. स्वत: क्लास घेतात. सुनील सरांनी बांधलेल्या बंदिशी तसेच उपशास्त्रीय रचना, गझल्स वगैरे स्वत:च्या कार्यक्रमांतून गातात. विद्यार्थिनींना शिकवतात. धाकटी कन्या स्वरदा उत्तम गाते परंतु शास्त्रीय संगीताकडे कल नाही. प्रोग्रॅम्समधून वडिलांच्या उपशास्त्रीय रचना गाते. मुलगा स्वीकार वडिलांकडून सतार शिकला आहे आणि त्यांच्या प्रोत्साहनाने याच क्षेत्रात कार्यरत आहे. सतार विषयात डॉक्टरेट पदवी संपादन केली आहे. मुंबई युनिव्हर्सिटीत सतार विषयाचा प्राध्यापक म्हणून काम करतो आहे. सतारीचे क्लास घेतो तसेच देशापरदेशांत फिरून सतारीचे कार्यक्रम करतो आहे. सुनील सर संगीत सेवेत शांत समाधानी जीवन व्यतीत करीत आहेत. त्यांना उत्तम आयुरारोग्यासाठी शुभेच्छा !!



अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२

# धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे

लोकांचा नेता, जननायक अशी ओळख असणाऱ्या धर्मवीर आनंद दिघे यांच्या आयुष्यावर आधारित 'धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे' या चित्रपटाच्या टिझरची सध्या सर्वत्र चर्चा आहे. अभिनेता प्रसाद ओकने साकारलेल्या आनंद दिघेंची झलक बघून तर सर्वच जण अवाक् झाले आहेत. केवळ दिसण्यातील साधर्म्यच नाही तर दिघे साहेबांच्या नजरेतील ती जरब, चेह-यावरचे ते तेजस्वी आणि कणखर बाण्याचे भाव, त्यांची देहबोली, संवादफेक हे सर्वच प्रसाद ओक यांनी एवढं सहज साकारलं आहे की साक्षात दिघे साहेबच पडद्यावर बघितल्याचा भास होतोय अशा प्रतिक्रिया समाजमाध्यमांतून उमटत आहेत.

या चित्रपटाबद्दल आणि प्रसाद ओक यांच्या भूमिकेबद्दलही उत्सुकता वाढलेली असतानाच




आणखी एका महत्त्वाच्या व्यक्तिरेखेच्या नावाचा उलगडा या सोहळ्यात करण्यात आला. धर्मवीर आनंद दिघे यांना गुरुच नव्हे तर देव मानणारे आणि सावलीसारखे त्यांच्यासोबत असणारे एकनाथ शिंदे यांची व्यक्तिरेखा अभिनेता क्षितिज दाते साकारणार आहे. प्रसाद ओक यांच्याप्रमाणेच क्षितिज दातेचाही लूक एकदम हुबेहूब जुळून आला आहे हे विशेष. ज्येष्ठ रंगभूषाकार विद्याधर भट्टे यांनी या चित्रपटातील हे सर्व लूक डिझाईन केले आहेत.

मनोरंजन विश्व

मुंबईत पार पडलेल्या या सोहळ्यात अभिनेते प्रसाद ओक आणि क्षितिज दाते त्यांच्या चित्रपटातील लुकमध्ये मंचावर अवतरले आणि त्यांना बघून उपस्थित असलेले सर्वच जण अवाक् झाले. 'धर्मवीर मुक्काम पोस्ट ठाणे' या चित्रपटात एकूण पाच गाणी आहेत. यातील गुरुपौर्णिमा आणि धर्मवीर ही गाणी अविनाश-विश्वजीत या जोडीने संगीतबद्ध केली आहेत. तर गोकुळाष्टमीचं गाणं आणि आनंद हरपला हे मंगेश कांगणे यांनी लिहिलेल्या गीतांना चिनार-महेश या जोडीने संगीतबद्ध केलं आहे. या चित्रपटात एक दमदार पोवाडा असून तो शाहिर नंदेश उमप यांनी संगीतबद्ध केला असून त्यांनीच गायला आहे. प्रविण तरडे यांच्या दमदार लेखन आणि कौशल्यपूर्ण दिग्दर्शनाने सजलेला, झी स्टुडिओज, मंगेश देसाई यांच्या साहिल मोशन आर्ट्सची निर्मिती असलेला 'धर्मवीर मु.पो. ठाणे' हा चित्रपट येत्या १३ मे रोजी झी स्टुडिओजच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे.

# उनाड

जेव्हा एखाद्या चित्रपटाची निवड एखाद्या महोत्सवासाठी होते, तेव्हा तो त्या चित्रपटाशी संबंधित सर्व व्यक्तींसाठी अभिमानाचा क्षण असतो. येत्या २६ मे ते १ जून २०२२ या कालावधीत झेक रिपब्लिक येथे प्रतिष्ठित असा झ्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव साजरा होणार आहे. त्यामध्ये युवा विभागात जिओ स्टुडिओज आणि प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक आदित्य सरपोतदार ह्यांचा बहुप्रतिक्षित मराठी चित्रपट 'उनाड' हा चित्रपट




निवडला गेला आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत, ज्योती देशपांडे, अजित अरोरा, चंद्रेश भानुशाली आणि प्रितेश ठक्कर निर्मित या चित्रपटात आशुतोष गायकवाड, हेमल इंगळे, अभिषेक भरते, चिन्मय जाधव, देविका दफ्तरदार आणि संदेश जाधव यांच्या मुख्य भूमिका आहेत.


'उनाड' ही महाराष्ट्रातील किनारपट्टीवरील मासेमारी करणाऱ्या हर्णे येथील तीन तरुण मुलांची कथा आहे. शुभ्या, बंड्या आणि जमील हे तीन मित्र आहेत .ते आपला वेळ गावात हुंदडण्यात घालवतात. त्यांच्या जीवनात कोणतेही ध्येय नाही.गावातील लोक त्यांना गावातील उनाड मुले समजत असल्याने, तिन्ही मुले अडचणीत येतात. त्यांच्या आयुष्यातील अशा एका टप्प्याची ही कहाणी आहे, जी त्यांना कायमची बदलते.

चित्रपटाच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करताना दिग्दर्शक आदित्य सरपोतदार म्हणतात, ''महत्त्वाच्या आणि संबंधित युवा वर्गात 'उनाड' ची निवड होणे ही चित्रपटासाठी सन्मानाची गोष्ट आहे. आम्ही कोळी समाजातील सध्याच्या तरुणांचा वास्तववादी विचार करण्याचा प्रयत्न केला असून या चित्रपटात तीन तरुणांचा प्रवास आणि त्यांचा संघर्ष दाखवण्यात आला आहे. या महोत्सवात 'उनाड'ची निवड होणे ही आमच्या टीमच्या प्रवासाची पावती आहे.''

यावरून मराठी चित्रपटाच्या कथानकातील वैविध्य आपल्याला लक्षात येते.

**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

# जनरल पोस्ट ऑफिस



पूर्वीच्या काळी संदेश दळणवळणाचे साधन पत्र तार जे पोस्ट ऑफिसद्वारे व्हायचे. मुंबई शहराचा होणारा विस्तार लक्षात घेता इंग्रजांनी १९११ साली जी.पी.ओ. साठी स्वतंत्र इमारत इंडो सारसेनिक शैलीत बांधली. ही वास्तुशैली मुंबईत सर्वात प्रथम जॉन बेग वास्तुविशारद- सरकारी सल्लागार यांनी व त्यांचे उत्तराधिकारी जॉर्ज विटेट यांनी वापरली. दर्शनी भागाचे नाट्यपूर्ण सुशोभीकरण आणि दर्शनी भागाचा उठावदार पोत या शैलीत आहे. मुंबईच्या आसपास उपलब्ध असलेल्या विविधरंगी पाषाणांचा वापर स्थापत्य कारणांनी या शैलीत इथे उभारणीसाठी केला हे विशेष.

जी.पी.ओ. इमारतीच्या उभारणीत उपयोग, सोय व वास्तुचे देखणे सौंदर्य या सर्वांचा सुरेख संगम आहे. इमारतीच्या काही भागाला तळघर ठेवले आहे आणि वर तीन मजली इमारत आहे. पोस्ट ऑफिसच्या अंतर्भागात आपल्याला मोकळेपणाने फिरता येते. म्हणून आजही फिरून सर्व अंतर्भाग बघू शकतो. येथे एक मोठे वर्तुळाकार दालन केंद्रस्थानी उभारलेले आहे आणि त्याच्यासमोर निरनिराळी खाती व त्यांची कामे चालवायची सोय केलेली आहे. केंद्रस्थानी असलेल्या दालनाची उंची पूर्ण तीन मजली असून तो मध्यभागी पूर्णपणे मोकळा ठेवलेला आहे. त्यामुळे दालनाच्या माथ्यावर इमारतीचा मुख्य घुमट येतो. या घुमटाची रचना विजापूरच्या गोल घुमटाशी साधर्म्य साधणारी वाटते. आज मोबाईल ई-मेल सुविधांमुळे पोस्ट ऑफिसचे महत्व कमी झाले असले तरीही ही वास्तु मुंबईच्या वैभवाचे एक प्रतीक आहे.

**संगीता बेहेरे**
९८६७७५८३१०
(फोर्टमध्ये फिरताना - भालचंद्र हर्डीकर)

सुगम संगीत : भावगीत / भक्तीगीत / अभंग व सिनेगीतांचा

**गायन क्लास**

**कलांजली**

- ''कलांजली'' या संस्थेतर्फे मराठी, हिंदी, भावगीते भक्तिगीते त्याचबरोबर सिनेगीते शिकवण्याचे वर्ग पेठे सेफ्टी लॉकर्सच्या मागे, चित्तरंजन रोड, विलेपार्ले (पूर्व) येथे गेल्या पाच वर्षापासून सुरू आहेत. या निमित्ताने आपली गाण्याची आवड जोपासण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे.
- प्रवेश घेण्यासाठी आपली **आवड व शिकण्याची जिद्द** हीच केवळ अट आहे.
- वयाची कोणतीही अट नसून केवळ **रूपये** २,०००/- महिन्याची फी असणार आहे. हा हॉल पूर्णत: एसी आहे.
- आठवड्यातून दोन दिवस क्लास घेतला जाईल.
- चौदा वर्ष गाणं शिकलेले डॉ.सत्यजित कोसंबी हे हार्मोनियमच्या व तबल्याच्या साथीने गाणी शिकवतात.

सोमवार ते शुक्रवार

**५.३० ते ६.३०**
**६.३० ते ७.३० व**
**७.३० ते ८.३० वाजता**

**अधिक माहितीसाठी संपर्क करा.**
**डॉ. सत्यजित कोसंबी - 8600640400**
**ठिकाण :-** पेठे सेफ्टी लॉकर्सच्या मागे, **चित्तरंजन रोड, विलेपार्ले (पूर्व).**
**एकदा अवश्य संपर्क करा .. मग ठरवा !!!**

# आपल्या पाल्यासाठी कोणती शिक्षण पद्धती योग्य राहील ?ऑफलाइन कि ऑनलाईन ?

गेल्या दोन-तीन वर्षात विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीला सामोरे गेले आहेत. प्रत्यक्ष क्लासरुम (offline) शिक्षण पद्धतीपेक्षा ऑनलाईन पद्धत फार वेगळी आहे आणि आपल्या पाल्यासाठी कोणती शिक्षण पद्धती योग्य राहील हे जाणून घेऊया.

इतर गोष्टींप्रमाणेच या दोन्ही पद्धतीना फायदे आणि तोटे आहेतच. ऑनलाईन पद्धतीचे फायदे आणि तोटे आपण पाहूया आणि निर्णय घेऊया.

**ऑनलाईन पद्धतीचे फायदे**

१. आपल्या पाल्याचा जंतु संसर्गापासून आणि विषाणू संसर्गापासून बचाव होतो.

२. पाल्याला घर ते कॉलेज किंवा क्लास असा प्रवास नसल्यामुळे वेळेची प्रचंड बचत होते.

३. स्वयंशिक्षणाचा पाया घातला जातो.

४. भिडस्त किंवा संकोची विद्यार्थी (जे वर्गात शंका विचारणे टाळतात कारण त्यांनी विचारलेल्या शंकांना इतर विद्यार्थी हसतील / आणि चेष्टा करतील अशी भीती वाटते) ऑनलाइन पद्धतीमध्ये चॅट बॉक्सचा वापर करून आपली शंका दूर करून घेऊ शकतात.

५. प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे आणि त्यांचे प्रश्न शिक्षकाला उपलब्ध असतात. यावर अधिक विचार करून या प्रश्नांच्या अनुषंगाने शिक्षक अधिक स्पष्टीकरण देऊ शकतात.

६. पाल्य घरी राहूनच शिकत असल्यामुळे पालकांचे लक्ष आपल्या पाल्याकडे राहते.

७. लेक्चरचे रेकॉर्डिंग उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थी ते पुन्हा पुन्हा पाहू शकतात आणि अधिक चांगल्या रीतीने आकलन करू शकतात.

८. ऑनलाईन टेस्ट पद्धतीमुळे प्रत्यक्ष प्रवेश परीक्षा देण्याबाबत आत्मविश्वास विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होऊ शकतो.

**ऑनलाईन पद्धतीचे तोटे**

१. शिक्षक आणि विद्यार्थी यामध्ये परस्परसंवाद कमी प्रमाणात होतो.

२. शिक्षक सर्व विद्यार्थ्यांकडे लक्ष देऊ शकत नाहीत.

३. शिक्षण प्रक्रिया सुरु असताना विद्यार्थ्यांकडे कमी कृतीशीलता असते म्हणून विद्यार्थ्यांना थकवा किंवा कंटाळा लवकर येऊ शकतो.

४. शिक्षकांना शिकवण्याचे पूर्ण समाधान मिळत नाही

**ऑनलाईन शिक्षण पद्धतीमध्ये आणखी सुधारणा करता येणे शक्य आहे ?**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षमता कमी अधिक असू असतात म्हणून त्यांना एकच प्रश्नपत्रिका देणे हे योग्य नसल्याने त्यावर उपाय शोधणे आवश्यक आहे.

मूल्यांकनामध्ये सर्वसाधारणपणे सर्व विद्यार्थ्यांसाठी एकच प्रश्नपत्रिका असते आणि या प्रश्नपत्रिकेची काठिण्य पातळी सरासरी एवढी (मध्यम) असते. प्रश्नपत्रिकेत विचारलेल्या दहा प्रश्नांपैकी सोपे प्रश्न तीन, मध्यम तीन, कठीण तीन आणि जास्त कठीण एक असे प्रश्नपत्रिकेचे स्वरूप असू शकते. कमी क्षमता किंवा कमी अभ्यास केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांना मिळालेल्या कमी गुणांमुळे (त्यांच्या मूल्यांकनामुळे)नैराश्य किंवा हताशपणा येऊ शकतो. या हताशपणाचा परिणाम म्हणजे अभ्यासातील लक्ष कमी होणे, अभ्यास टाळण्याकडे मनोवृत्ती वाढणे आणि मनात न्यूनगंड निर्माण होणे इत्यादी होऊ शकतो. तसेच आपल्यापेक्षा जास्त चांगले गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रति द्वेषही त्यांच्या मनात निर्माण होऊ शकतो आणि त्यांची विध्वंसक वृत्ती वाढू शकते.

हे टाळण्यासाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार ठरवणे योग्य राहील.

यासाठी संगणकाची मदत घेतली जाऊ शकते.सर्वसामान्यपणे प्रश्नपत्रिकेचे आणि उत्तर पत्रिकेचे मूल्यांकन करतांना फक्त बरोबर उत्तराकडेच लक्ष केंद्रित केले जाते.बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेमध्ये एक उत्तर बरोबर असते (एक पर्याय बरोबर असतो आणि उरलेले पर्याय चुकीचे असतात) अशा प्रश्नांच्या उत्तराचे मूल्यांकन करतांना त्या विद्यार्थ्याने चुकीचा पर्याय का निवडला याचा विचार किंवा विश्लेषण केले जात नाही. वस्तुत: उर्वरित पर्याय चुकीचे का होते हे समजल्यास विद्यार्थ्याचा पाया पक्का होतो.

संगणकीय प्रणालीनुसार प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचे विश्लेषण केले जाऊ शकते,उत्तर चुकीचे असल्यास त्याच प्रश्नाच्या संकल्पनेवर परंतु सोपा प्रश्न संगणक तयार करून विद्यार्थ्याला विचारू शकतो, या प्रश्नाचे उत्तर बरोबर येण्याची अपेक्षा असते परंतु याही प्रश्नाचे उत्तर चुकीचे दिले गेल्यास आणखी सोपा प्रश्न संगणकाकडून विचारला जाईल अशी पद्धती वापरल्यास विद्यार्थ्यांची उजळणी होत राहील आणि त्याचा आत्मविश्वासही वाढेल.



ही पद्धती जरी अधिक वेळ घेणारी असली तरी फलदायी ठरेल. अर्थात अंतिम उद्देश अभ्यासक्रम पूर्ण करणे हाच आहे.तसेच अशा संगणकीय प्रणालीचा उद्देश शिक्षक विरहित शिक्षण पद्धती निर्माण करणे नसून विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धत निर्माण करणे हा आहे. आपल्या पाल्यासाठी दोन्ही शिक्षण पद्धतींचा (offline and online) सुवर्ण मिलाप करून म्हणजेच हायब्रीड शिक्षण पद्धत वापरणे जास्त योग्य राहील.अर्थात महाविद्यालयांमध्ये अशा प्रकारची शिक्षण पद्धती राबवता येईल किंवा कसे याबाबत अद्याप धोरण स्पष्ट केले गेले नाही म्हणूनच आपण आपल्या पाल्यासाठी खाजगी कोचिंग क्लास मध्ये प्रवेश घेताना हायब्रीड शिक्षण पद्धती असलेल्या क्लासचा विचार करणे उपयुक्त ठरेल असे वाटते.

**प्रा. विनायक अंतरकर**
९८२०६५१०६८






## Parlebazaar Growing Fast.....

आपला व्यवसाय 'पार्ले बझार.कॉम' वर नोंदवला आहे ना? नसेल तर आजच नोंदवा. 'पार्ले बझार.कॉम' म्हणजे पार्ल्यातील उद्योजकांना प्रसिद्धीसाठी एक सक्षम मंच. पार्ल्यातील बरेच व्यवसाय आता पार्ले बझार.कॉम वर नोंदवले गेले आहेत. अजूनही वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यावसायिक या साईटवर आपला व्यवसाय नोंदवत आहेत. या साईटच्या माध्यमातून आपल्या व्यवसायाची जाहिरात पार्लेकरांपर्यंत पोहोचवत आहेत.

बऱ्याच गोष्टी पार्लेकरांसाठी या साईटमध्ये आपण अशा पद्धतीने दिल्या आहेत की पार्ल्यातील काहीही शोधायचे असेल तर ते 'पार्ले बझार' मध्ये नक्की मिळेल.

हि वेबसाईट म्हणजे पार्ल्याची सेक्शनवाईज वेब डिरेक्टरी म्हणूनही वापरता येईल. अगदी फायनान्स सेक्शनमध्ये बँकांपासून ते एज्युकेशन सेक्शनमध्ये शाळा, कॉलेज, हेल्थ सेक्शनमध्ये डॉक्टर्स, हॉस्पिटल्स, फूड सेक्शनमध्ये फूड स्टोर्स अशा बऱ्याच गोष्टींची माहिती तुम्हाला येथे मिळू शकेल. यात फायनान्स, प्रॉपर्टी, हेल्थ, फूड, टेक, स्पोर्ट्स, ब्रॅण्डिंग, ट्रॅव्हल, फॅशन, एज्युकेशन इ. अनेक विभाग आहेत. त्यामुळे या प्रत्येक विभागातील माहिती पार्लेकरांना व्यवस्थित उपलब्ध होईल अशा प्रकारे आम्हीही प्रयत्न करत आहोत. आपणास काही सूचना द्यावयाच्या असतील तर आपण नक्की देऊ शकता. काही गोष्टी ज्या यात असायला हव्यात पण अनवधानाने आमच्याकडून राहून गेल्या असतील तर आम्हाला त्याबद्दल नक्की कळवा. आम्ही त्या यात प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न करू.

पार्ल्याच्या वेब डिरेक्टरी बरोबरच पार्ल्यातील आगामी गृहनिर्माण प्रकल्प, घरांची खरेदी विक्री, आगामी टूर्स / सहली, दीनानाथ मधील नाटके, क्लासिफाईड जाहिराती, वेगवेगळ्या विषयांवरील ब्लॉग्स, लेखही येथे आपणाला वाचायला मिळतील.

पार्ल्यात अनेक छोट्या उद्योगांपासून मोठ्या कंपन्या चालवणारे लोक राहतात. त्यांच्यासाठी कमी खर्चात या मंचाच्या आधारे आपला उद्योग अधिक लोकांपर्यंत नेण्याची, स्वत:ची आर्थिक वृद्धी करण्याची आणि पार्लेकरांनाही 'स्थानिक' उत्पादने घेण्याची संधी मिळते. गरज असल्यास लोकांना त्यांच्या उद्योगाचे स्वतंत्र वेबपेज करून मिळते. या वेबपेजची झेप वैश्विक असल्याने त्या व्यक्तीचा फायदा होतोच.

पार्ले बझार.कॉम एका प्रकारे पार्ल्यातील व्यावसायिकांसाठी आणि पार्लेकरांसाठीही वेगवेगळ्या व्यवसायांची माहिती, वेगवेगळ्या सवलती, बदलते मार्केट ट्रेंड्स,पार्ले व्यवसाय विश्वात नवीन काय? अशा वेगवेगळ्या प्रकारच्या माहितीसाठीचा एक उत्तम स्रोतच म्हणावा लागेल.

आपण जर व्यावसायिक असाल तर खालील लिंक वर क्लिक करून आपली माहिती आमच्यापर्यंत पोहोचवा. व्यावसायिक नसाल तरीही वेगवेगळे अपडेट्स मिळवण्यासाठीही आपण या वेबसाईटचे विनामूल्य सभासदत्व घेऊ शकता.

**लिंक :** www.parlebazaar.com

Contact for Advt. : 9769261182 / 8104286202 /8779659843

## www.onlinepropertyexpo.in

सादर करत आहोत, एक अशी वेबसाइट ज्यात तुम्हाला पाहता येईल गृहप्रकल्पांचे आणि गृह प्रकल्पांशी निगडित वेगवेगळ्या गोष्टींचे प्रदर्शन अगदी पूर्ण वर्षभर !

कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून बहुतांश जाहीर कार्यक्रमांवर निर्बंध आले आहेत. त्यामुळे बहुतांश उद्योग-व्यवसायांनी ऑनलाइनची वाट धरली. मात्र, घर खरेदी-विक्रीसाठी अशाप्रकारे काही ऑनलाइन व्यवस्था पुरेशा प्रमाणात उपलब्ध नव्हती. या पार्श्वभूमीवर www.onlinepropertyexpo.in ही वेबसाइट २५ एप्रिल २०२२ या दिवशी लाँच करण्यात आली.

या वेबसाइटचे वैशिष्ट्य म्हणजे ही प्रदर्शनांच्या स्वरूपातली वेबसाइट असून यात वेगवेगळ्या गृहप्रकल्पांचे , गृहप्रकल्पांशी निगडित अनेक गोष्टींचे प्रदर्शन तुम्हाला पूर्ण वर्षभर अनुभवता येईल.

या वेबसाइटमध्ये मुंबईसह नवी मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक , कोल्हापूर ,कोकण अशा विविध विभागांतील मान्यवर डेव्हलपर्स आपल्या प्रॉपर्टीज, वेगवेगळे प्रोजेक्ट्स प्रदर्शित करणार आहेत. यामध्ये वेगवेगळ्या गृहप्रकल्पांबरोबरच सेकंड होम ऑप्शन्स, लँड, प्लॉट्स, इंटिरिअर डिझायनिंग, घरांसाठीचे कर्ज अशा गोष्टींचेही वेगवेगळे पर्याय येथे असणार आहेत.

या एक्स्पो वेबसाइटच्या माध्यमातून एक्झिबिट करणाऱ्यांनाही खूप कमी किंमतीत भरपूर लोकांपर्यंत पोहोचता येईल आणि त्यांना आपल्या बद्दलची माहिती सहजपणे ग्राहकांपर्यंत पोहोचवता येणार आहे. यामध्ये डेव्हलपर, कन्सल्टंट, आर्किटेक्ट, इंटिरिअर डेकोरेटर, फायनान्स आदींसह प्रॉपर्टीशी निगडित इतर विविध सेवांचा समावेश असणार आहे, त्यामुळे घरांची खरेदी-विक्री करू इच्छिणाऱ्या दोन्ही गटांना या विशेष प्रॉपर्टी एक्स्पो वेबसाईटचा लाभ घेता येईल.

हा एक्स्पो अटेंड करण्यासाठी www.onlinepropertyexpo.in या साइटवर जाऊन नोंदणी करणे आवश्यक आहे. तेथे नोंदणी केल्यानंतर हॉल्स या पेजवर आपण रिअल इस्टेट प्रोजेक्टस्, कन्सल्टंट, अलाइड प्रोडक्टस् अॅण्ड सर्व्हिस, लोन्स अॅण्ड फायनान्स, सेकंड होम आदी विविध पर्याय आहेत. त्यावर क्लिक करून त्यातील सेवा पाहता येणार आहेत. या विविध पेजवर क्लिक केल्यानंतर संबंधित विषयाशी निगडित सविस्तर माहिती आणि प्रोजेक्टसची तसेच कंपनीची माहिती, फोटो, व्हिडिओज् आदी पाहता येणार आहेत. त्याचप्रमाणे संबंधित कंपनीच्या प्रतिनिधीसोबत त्याचवेळी ऑनलाइन संवाद देखील साधता येणार आहे.

तसेच वेळोवेळी या साइटच्या माध्यमातून गृह प्रकल्पांविषयी किंवा त्याच्याशी निगडित विषयांविषयी वेगवेगळे सेमिनार्स, ऑनलाईन कॉन्फरन्स घेण्यात येतील जे अटेंड केल्यामुळे या क्षेत्राबद्दलची भरपूर माहिती, नवीन ट्रेंड्स याविषयी आपण जाणून घेऊ शकाल.

त्यामुळे अधिकाधिक जणांनी यामध्ये आपली नोंदणी करून याचा लाभ घ्यावा.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

www.onlinepropertyexpo.in
9769261182 / 8169825961

